


Sanjay Ghodawat International School achieved

**“ India’s Top 10 International – Day Cum Schools ”**

**Ranked No. 1 in Kolhapur**
**Ranked No. 1 in Maharashtra**
**Ranked No. 5 India**

**By Education Today, Bangalore**
**On**

**12th December 2016**

Press Release

Daily Sakal , 14th December 2016

# संजय घोडावत स्कूल राज्यात 'नंबर वन'

## देशात पाचव्या क्रमांकावर : बंगळूरच्या एज्युकेशन टुडेकडून मानांकन

जयसिंगपूर, ता. १३ : आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेऊन विद्यार्थ्यांच्या चौफेर प्रगतीचे टप्पे पार करणाऱ्या संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलने राज्यात पहिल्या तर देशात पाचव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. एज्युकेशन टुडे, बंगळूर या संस्थेच्या सर्वेक्षणात घोडावत इंटरनॅशनल स्कूलला हे मानांकन मिळाले आहे. बंगळूर येथील हॉटेल चान्सरी पॅव्हेलियनमध्ये झालेल्या सोहळ्यात संस्थेच्या विश्वस्त विनायक भोसले यांनी एज्युकेशन टुडेचे अध्यक्ष अनिल शर्मा यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

'डे स्कॉलर कम बोर्डिंग' या प्रकारातून हा पुरस्कार प्रदान केला. २०१० मध्ये सुरू केलेल्या स्कूलने अल्पावधीत गुणवत्तापर्ण शिक्षणाने शिक्षण क्षेत्रात प्रगतीचे टप्पे पार केले आहेत. याठिकाणी



**बंगळूर : एज्युकेशन टुडेचे अध्यक्ष अनिल शर्मा यांच्याकडून संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलच्या राज्यात पहिल्या क्रमांकाचा बहुमान स्वीकारताना विश्वस्त विनायक भोसले.**

स्टेट बोर्ड, सीबीएसई, नवी दिल्ली व आयजीसीएसई, केंब्रीजचे अभ्यासक्रम शिकवले जातात. आज साडेतीन हजारांहून अधिक विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेत आहेत.

शैक्षणिक कामकाज, निकालातील प्रगती, पालकांची विश्वासर्हता, विद्यार्थ्यांसाठीच्या सोयीसुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षक, क्रीडा मैदान या बाबी लक्षात घेण्यात आल्या. एज्युकेशन टुडे या संस्थेने अनेक शिक्षण संस्थांची पाहणी करून घोडावत स्कूलला हा बहुमान प्रदान केला आहे.

श्री. शर्मा यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव करताना संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे या बहुमानाला पात्र ठरल्याचे सांगितले. यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट समन्वयक अभिजित लाटकर, अनुज भंडारी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**बदलत्या शिक्षणाचा वेध घेऊन स्कूलची वाटचाल सुरू आहे. स्कूलच्या यशात प्राचार्या सस्मिता मोहंती यांच्यासह त्यांच्या स्टाफचे योगदान आहे. संस्कारक्षम पिढी तयार करण्याचे कार्य स्कूलमध्ये सुरू आहे. पुरस्काराने जबाबदारी वाढली असून सर्वांच्या पाठबळावर यापेक्षाही चांगले कार्य करत राहू.**

**- संजय घोडावत**

**अध्यक्ष,**

संजय घोडावत इन्स्टिट्यूट, अतिग्रे